नकलेचा अर्ज मिळालेला दिनांक 1753/19 10/7/19

नकलेचा फैरो मिळालेला दिनांक 10/7/19

नकल तयार केलेचा दिनांक..................

नकल दिनांक..................



सुधारित

परिशिष्ट (ब)

नि. ५

ज्ञापन (मेमोरन्डॅम ऑफ असोशिएशन)

१) संस्थेचे नांव :- एकलव्य आदिवासी भटक्या विमुक्त जाती जमाती व मागास वर्गीय सेवाभावी संस्था,

२) संस्थेचा पत्ता :- द्वारा- श्री. अण्णासाहेब विठ्ठलराव बलमे, आम्रपाली को-ऑप हौसिंग सोसायटी लि. बी/१०३, फिरोजशहा नगर, विक्रोळी[ईस्ट], मुंबई-४०००७९

३) संस्थेचे उद्देश :- संस्थेचे उद्देश खालील प्रमाणे राहतील.

संगमनेर तालुक्यातील आदिवासी भटक्या विमुक्त जाती जमाती व मागास वर्गीया व आर्थिक दृष्टया दुर्बल अशा रहिवाश्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलासाठी संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे राहतील.

१) शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे.

२) आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन देणे. व आरोग्य विषयक योग्य मार्गदर्शन करणे.

३) सांस्कृतिक विकासासाठी बौध्दिक, व्याख्याने आयोजित करणे.

४) लोक शिक्षणासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणे अथवा राबविणे.

५) इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळा सुरु करणे.

६) बालसदन, बालगृह, वस्तीगृह, कन्या छात्रालय, आदिवासी शाळा, आश्रमशाळा, अनाथश्रम, आधारश्रम, मुकबधीर, मतीमंद व अंध विद्यालय सुरु करणे.

७) अंध, अपंग शाळा व त्यांच्या कला गुणांना वाव देणारे शिक्षण वर्ग सुरु करणे.

८) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु करणे.

९) सेंद्रीय शेतीसाठी मार्गदर्शन करणे.

१०) वातावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षरोपन कार्यक्रमांचे आयोजन करणे.

११) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सेंद्रीय शेती, गांडुळ खत निर्मीती करणे, जलसंधारण, पाणी आडवा पाणी जिरवा या योजनांची माहिती केंद्र सुरु करणे व तसेच योजना राबविणे.

१२) संस्थेमार्फत जनावरांचीमोफत छावणी / चारा डेपो चालु करणे.

अध्यक्ष
विजय कुशाबा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

१३) गोशाळा सुरु करणे व चालविणे.

१४) पांचभौतिक औषधी व गो - मातेच्या गोमुत्र, गो दुग्ध व गोमय पासून निरनिराळी औषधी बनविण्याविषयी मार्गदर्शन करणे.

१५) कृषी विद्यालय व महाविद्यालय सुरु करणे.

१६) मुला मुलींसाठी विविध विभागानुसार (शिक्षण स्तर व प्रकार) ज्युनिअर कॉलेज व सिनिअर कॉलेज, एम.बीए. कॉलेज, डी.फार्म, डी.एम.एल.टी, बी. फार्म कॉलेज सुरु करणे तसेच मुला मुलींसाठी वस्तीगृह सुरु करणे.

१७) शिक्षणाचा प्रसार व प्रचार होण्याकरिता वेगवेगळया माध्यमांच्या बालवाडया, अंगणवाडी, वस्तीगृह शाळा, बाल शाळा, प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, बी लीप, एम लीप ग्रंथालयाची कॉलेज, डी.एड., बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., लॉ कॉलेज त्याच प्रमाणे शैक्षणिक क्षेत्रातील सर्व विभागातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च व महाविद्यालय चालू करणे.

१८) महिला समउपदेशन केंद्र, बाल संगोपन केंद्र, निवासी बालसदन केंद्र, बालगृह, बालकाश्रम व नर्सिंग कॉलेज सुरु करणे.

१९) तंत्रनिकेतन व महाविद्यालय सुरु करणे.

२०) महिलांना रोजागाराभिमुख प्रशिक्षण देणे व त्यांना सक्षम करणे.

२१) आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करुन देणे तसेच धर्मदाय हॉस्पिटल चालविणे.

२२) शालेय मुलांचे आरोग्य तपासणी तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करणे.

२३) सार्वजनिक आरोग्य जोपासण्याकरीता मोफत कार्यक्रम आयोजित करणे.

२४) अंध, अंपगांना कृत्रिम साहित्य पुरविणे.

२५) आरोग्य अबाधित राहण्यासाठी योगासने, ध्यान साधना वर्ग सुरु करणे.

२६) संस्थेचे मेडिकल व पॅरोमेडिकल संदर्भातील कोर्सेस सुरु करणे. (उदा. ॲलोपॅथिक, हॉमिओपॅथी विद्यालय, आयुर्वेदिक महाविद्यालय इ. प्रशिक्षण केंद्र, एड्स रुग्णसेवा केंद्र, ग्रामीण हॉस्पिटल इ.) नर्सिंग कॉलेज सुरु करणे व चालविणे.

अध्यक्ष
विजय कुशावा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

२७) रोगराई होवू नये म्हणुन जनजागृती करणे. उदा. टी.बी., पाण्यापासुन होणारे रोग, एड्स इ.

२८) आरोग्य सेविके मार्फत आरोग्य ग्रामदत्तक योजना मोफत राबविणे.

२९) निरनिराळ्या औषधोपचार संशोधन करणे व मार्गदर्शन करणे.

३०) रक्तदान शिबीर भरविणे. तसेच नेत्रदान करणे विषयी मार्गदर्शन करणे.

३१) व्यसनमुक्तीचा प्रसार व प्रचार करणे.

३२) पोलिओ, देवी, कुष्टरोग, एड्स, हीपीटाईटीस-बी, कॅन्सर, नारु, क्षयरोग, साथीचे रोग यांसारख्या रोगांचे निर्मुलन विकास कार्यक्रम मोफत राबविणे. बाल आरोग्य जोपासण्याकरिता आहाराविषयी मार्गदर्शन करणे, लसीकरण याविषयी जनजागृती करणे.

३३) रुग्णसेविका प्रशिक्षण केंद्र सुरु करणे.

३४) निसर्ग उपचार केंद सुरु करणे व तसेच योगासने केंद्र सुरु करणे.

३५) विविध खेळांच्या स्पर्धा भरविणे.

३६) शारीरिक शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे.

३७) व्यायाम शाळा सुरु करणे.

३८) शालेय विद्यार्थ्यांना विविध खेळा विषयी मार्गदर्शन व शिबीर राबविणे.

३९) शालेय विद्यार्थ्यांना सर्व धर्म समभाव हवा वृत्तीची जोपासना करणे विषयी मार्गदर्शन करणे.

४०) थोर नेत्यांच्या जयंती उत्सव साजरा करणे. (उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गणपती उत्सव, महात्मा फुले जयंती इ.)

४१) वृध्दाश्रम सुरु करणे.

४२) पर्यावरण समतोल राखण्यास मदत करणे.विवाह समुपदेशन करणे.

४३) भारतीय संस्कृतीला अनुसरुन विवाहाबाबत मार्गदर्शन करणे.

४४) विवाहपुर्व समुपदेशन करणे.

४५) सर्व धर्म सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करणे.

४६) महिलांना व्यवसायभिमुख शिक्षण देणे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | सचिव |
| विजय कुशाबा पिसे | निलीमा रघुनाथ गुणे |

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

नि ०६

# सुधारीत

## नियम व नियमावली

परिशिष्ट (क)

एकलव्य आदिवासी भटक्या विमुक्त जाती जमाती व मागास वर्गीय सेवाभावी संस्था,
द्वारा- श्री. अण्णासाहेब विठ्ठलराव वलमे, आम्रपाली को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
बी/१०३, फिरोजशहा नगर, विक्रोळी[ईस्ट], मुंबई-४०००७९

१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

खालील संज्ञाचे व्याख्या सामान्यपणे पुढीलप्रमाणे रहातील.

अ] **ट्रस्ट :-** म्हणजे विश्वस्त संस्था.

ब]**कार्यकारी मंडळ :-** म्हणजे या संस्थेच्या व्यवस्थापनेसाठी नेमलेले किंवा निवडले गेलेले सदस्यांचे मंडळ.

क]**ट्रस्टी किंवा विश्वस्त :-** म्हणजे त्या व्यक्तीकडे केवळ त्या कडेच किंवा इतर व्यक्तींच्या समवेत विश्वस्त मालमत्ता लिहीत असेल ती व्यक्ती.

ड]**कार्यक्षेत्र :-** म्हणजे संस्था ज्या क्षेत्रात मर्यादित कार्य करणार आहे ते क्षेत्र.

इ]**सभासद :-** म्हणजे कोणतीही सज्ञान भारतीय व्यक्ती जी संस्थेच्या नियमाला बांधील राहुन विहीत नमुन्यात अर्ज करुन कार्यकारी मंडळात त्या अर्जाचा स्विकार केल्यानंतरची व्यक्ती.

ई]**ट्रस्ट फंड व मिळकत :-** म्हणजे संस्थेच्या मालकीची पण संस्थेच्या ताब्यात दिलेली सर्व गुंतवणुक, रक्कम, स्थावर, व जंगम मिळकत यामध्ये विशिष्ट हेतुसाठी संस्थेस देणगी रुपाने स्विकारणेच्या रक्कमेचा मालमत्तेचा समावेश राहिल.

ड]**आर्थिक वर्ष :-** म्हणजे १ एप्रिल पासुन सुरु होऊन ३१ मार्च रोजी संपणा-या बारा महिन्याचा कालावधी असेल.

२) कार्यक्षेत्र :- म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र राज्य.

३) हिशोबाचे वर्ष :- १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल.

अध्यक्ष
विजय कुशावा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुंणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

४) <u>सभासदत्व त्याची नोंदणीची पध्दत</u> :- कोणत्याही सज्ञान जीला या संस्थेचे नियम मान्य आहेत अशा व्यक्तीने विहीत नमुन्यात अर्ज केल्यानंतर व ठराविक फी भरल्यानंतर व अशा अर्जाचा कार्यकारी मंडळात स्विकार केल्यानंतर त्या व्यक्तीस संस्थेचे सभासदत्व प्राप्त होईल.

५) <u>सभासदाचे प्रकार</u> :-

खालील प्रमाणे दोन प्रकारचे सभासद राहतील.

अ] <u>साधारण सभासद</u> :- वार्षिक रुपये ११/- वर्गणी आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर एक महिन्याचे आत रितसर पैसे भरुन साधारण सभासद होता येईल.

ब] <u>आजीव सभासद</u> :- रुपये ५१/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी एकावेळी देऊन देणगी देणा-याच्या इच्छेनुसार व कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने देणगीदारास आजीव सभासद होता येईल.

६) <u>सभासदाचे सदस्यत्व रदद होणे बाबत</u>:-

१. सभासद फौजदारी गुन्हयाखाली शिक्षेस पात्र झालेस.

२. त्याचे कडुन अनैतिक अध:पात घडल्यास.

३. एखादया सदस्याने संस्थेच्या हिताविरुध्द वर्तन केल्यास व अशा गोष्टी कार्यकारी मंडळाचे नजरेसमोर आल्यानंतर कार्यकारी मंडळाचे सभेत बहुमताने सभासदाचे सदस्यत्व रदद केले जाईल.

७) <u>सर्वसाधारण सभा तिचे अधिकार आणि कार्य</u> :-

१. सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्व श्रेष्ठ व निर्णयी सभा म्हणुन समजली जाईल.

२. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेवु शकतील.

३. उपस्थित सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम बाकी नसावी. बाकी असल्यास त्या सदस्याला मतदानात भाग घेता येणार नाही. त्याचप्रमाणे ज्या सदस्याला संस्थेत प्रवेश घेऊन एक वर्ष पूर्ण झाले नसल्यास त्यास उपस्थित राहता येईल, मात्र मतदानात भाग घेता येणार नाही.

४. कार्यकारी मंडळाने चालविलेला कामावर नियंत्रण ठेवणे.

५. वार्षिक हिशोब मंजुर करणे.

६. पुढील वर्षाचे नविन अंदाजपत्रक तयार करणे व मंजुर करणे.

७. वेळेवर अध्यक्षांचे परवानगीने येणारे ठराव सभेपुढे मांडुन मंजुर अगर नामंजुर करणे.

अध्यक्ष
विजय कुशावा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुंजे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

८. कार्यकारी मंडळाची निवड करणे.

९. संस्थेच्या हिताच्या दृष्टिने आवश्यक असल्यास सात दिवसांचे आत चार कार्यकारी मंडळ सदस्यांचे विनंतीवरुन सभा अध्यक्षांनी आयोजित केली पाहिजे.

८) <u>सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या</u>:-सर्वसाधारण सभेसाठी सात पूर्ण दिवसानंतर नोटीस सदस्यांमध्ये प्रस्तुत करणेत येईल. तिच अशी सभा ज्या तारखेस ज्यावेळी व जेथे घेणेत येईल ती तारीख वेळ व जागा व सदर सभेत करण्यात येणारी कामे निर्दिष्ट करण्यात येईल व सदरची नोटीस संस्थेच्या कार्यालयात लावली जाईल सर्वसाधारण सभेचा कोरम पुर्ण होणेसाठी सर्व प्रकारचे सभासदाचे २/३ उपस्थित असणे आवश्यक आहे.जर सभासदांच्या सभेच्या नोटीसमध्ये असा उल्लेख असला तरीही आवश्यक कोरम पुर्ण न झाल्यास त्याठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा होईल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

९) <u>विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्य</u> :-अध्यक्ष व कार्यकारी मंडळास जरुर वाटल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलाविली जाईल. तसेच कमीतकमी एकुण सभासद संख्येच्या २/३ सभासदांची लेखी मागणी केल्यास ते मागणीपत्र सादर झालेनंतर एक महिन्यांचे आत अशी विशेष सभा अध्यक्ष,सेक्रेटरीच्या मदतीने बोलावतील या सभेची नोटीस व विषय पत्रिका सभासदांना किमान १० दिवस आधी दिली जाईल व अशा सभेत विषय पत्रिकेवर नसलेल्या विषयांचा विचार केला जाणार नाही.

१०) <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ ,पदाधिकारी व त्यांची रचना</u> :-

संस्थेचे कार्यकारी मंडळ एकुण सात सभासदांचे राहिल निवडुन आलेले कार्यकारी मंडळ आपआपसांत पुढीलप्रमाणे पदाधिकारी निवडतील.

१. अध्यक्ष - एक

२. उपाध्यक्ष - एक

३. सेक्रेटरी-एक

४. जॉ. सेक्रेटरी - एक

५. खजिनदार - एक

अध्यक्ष
विजय कुशाबा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

६. सदस्य - दोन

११) <u>कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत</u> :-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल एकुण पाच वर्षाचा राहिल. निवडणुकीची पध्दत गुप्त मतदान पध्दतीने सर्व साधारण सभेत बहुमताने दर पाच वर्षांनी होईल.

१२) <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांचे कामे</u> :-

१. <u>अध्यक्ष</u> :-

सभेचे कामकाज चालविणे, व संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे संस्थेच्या कारभारावर व शाखेवर नियंत्रण ठेवणे सर्वसाधारण सभा आयोजित करणे. जर सेक्रेटरीने एखादा सभा बोलावली नाही तर अशी सभा अध्यक्ष बोलावेल.

२. <u>उपाध्यक्ष</u> :-

अध्यक्षांचे गैरहजेरीत अध्यक्षांचे काम करणे. अथवा त्यांना त्यांच्या कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

३. <u>सेक्रेटरी</u> :-

१. कार्यकारी मंडळाच्या सभा बोलाविणे.

२. संस्थेचे पत्रव्यवहार करणे.

३. तक्रारीचे निवारण करणे.

४. संस्थेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास कोर्ट कचेरीची कामे करणे.

५. संस्थेच्या कार्यावर लक्ष ठेवणे.

६. वार्षिक खर्चाची बिले मंजुर करणे.

७. रोज हिशोब पाहून त्यावर सहया करणे.

८. खर्चाची बिले मंजुर करणे.

९. सेवकांवर देखरेख ठेवणे, त्यांच्या अडीअडचणी पाहून त्यावर त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे व त्यांना आवश्यक ती मदत करणे.

१०. ठरावाप्रमाणे मंजुर झालेले ठराव अंमलात आणणे.

अध्यक्ष
विजय कुशाबा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

४. **जॉईन्ट सेक्रेटरी** :- सेक्रेटरींच्या गैरहजेरीत सेक्रेटरीचे काम करणे अथवा त्यांना त्यांच्या कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

५. <u>खजिनदार</u> :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे हिशोब लिहीणे अगर लिहुन घेणे, हिशोब पूर्ण झाल्यावर सेक्रेटरी समोर ठेवणे हिशोबाच्या पुस्तकावरुन वार्षिक पत्रके तयार करणे. रक्कनेची देवाण घेवाण करणे ऑडिटर यांनी हिशोब तपासून काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

६. <u>सदस्य :-</u>

संस्थेच्या सर्व कामात सहकार्य करणे व मिटींगमध्ये व मतदानात भाग घेणे.

१३) <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा</u>:-कार्यकारी मंडळाची सभा दर तीन महिन्यातुन एकदा तरी बोलाविली पाहिजे. व कार्यकारी मंडळाच्या २/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास तातडीची कार्यकारणी सभा अध्यक्षांनी तीन दिवसांचे आत बोलाविली पाहिजे.

१४) **<u>कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या</u>** :-कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना तीन दिवस अगोदर पाठविली पाहिजे व सदर सभेत एकुण २/३ सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने तेथेच भरेल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

१५) <u>कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम</u> :-

१.संस्थेची कोणत्याही प्रकारीच बाकी येणे असल्यास निवडणुकीसाठी सदस्य अपात्र असेल.

२.निवडणुक अधिका-याची नियुक्ती सात दिवसांपुर्वी करावी.

३.एक वर्षभर साधारण सभासद राहिल्यानंतर त्यास मतदानाचा अधिकार प्राप्त होईल.

४.निवडणुक खुले मतदान पध्दतीने होईल.

५.निवडणुकीच्या तारखेच्या सुचना आठ दिवसांपुर्वी ऑफीस नोटीसाव्दारे दयावी.

अध्यक्ष
विजय कुशावा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

१६) **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-** पदाधिक-यांनी राजीनामा दयावयाचा असल्यास तो त्यांनी अध्यक्षांचे जवळ दयावा आलेला राजीनामा कार्यकारी मंडळापुढे ठेऊन बहुमताने मंजुरी द्यावी. राजीनामा मंजुर होईपर्यंत सभासदाचे पद कायम राहिल. एखादया ट्रस्टींच्या मृत्युमुळे किंवा राजीनाम्यामुळे एखादी जागा रिकामी झाली तर त्या जागी नविन सभासद कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने घेता येईल.

१७) **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-**

१. कार्यकारी मंडळाची सभा चार महिन्यातुन एकदा तरी बोलाविली पाहिजे.

२. कार्यकारी मंडळाच्या पाच सभासदांनी लेखी मागणी केल्यास तातडीची सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी तीन दिवसाचे आत बोलाविली पाहिजे.

३. संस्थेच्या सेवकांची नेमणुक करणे, त्यांच्यावर लक्ष नियत्रंण ठेवणे त्यांना कामावरुन काढणे की ज्यामुळे संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालेल.

४. संस्थेच्या अंतर्गत चालणा-या इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे.

५. संस्था चालविणा-या करीता आवश्यक असलेले किरकोळ नियम तयार करणे.

६. सर्वसाधारण सभेच्या ठरावाची पुर्तता करणे.

७. संस्थेच्या वार्षिक कार्यकारी मंडळाची यादी तयार करुन विभागीय अस्टिंट ऑफ सोसायटीज यांचे कार्यालयात त्यांच्या ठरावाच्या नकलेसहित दाखल करणे. त्याचप्रमाणे संस्थेच्या मालमत्तेत व मंडळात बदल झाल्यास अर्ज विभागीय कार्यालयात पाठविणे.

८. सभासदांची यादी ठेवणे संस्थेच्या कर्मचा-यांची व त्यांच्या नोकरींचे अटींचे पुस्तक कायदयाप्रमाणे ठेवणे व त्याबाबत परिशिष्ट २ प्रमाणे माहिती रजिष्टर याचे कार्यालयात दरवर्षी पाठविणे.

९. जमाखर्चाचे हिशोब ठेऊन ऑडिट करणे व ते सर्व साधारण सभेपुढे ठेवणे.

१०. उपसमित्या नेमणे किंवा एखादया कामाकरिता एखादया सदस्याला विशेष अधिकार देणे.

११. कार्यकारी मंडळाचे सभेत एकुण ३/५ सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने तेथेच भरेल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

अध्यक्ष
विजय कुशाबा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurveda ...
Manchi Hill, Ashvi Bk, Pin ...
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

१८) <u>संस्थेच्या निधी, मिळकत व विनियोग</u> :-संस्थेच्या निधीमध्ये सभासद वर्गणी देणगी, सरकारी अनुदाने, तसेच सभासदांनी केलेल्या कार्यक्रमाचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम संस्थेच्या मिळकतीचा विनियोग संस्थेच्या उददेशावर करणेत येईल.

१९) <u>उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद</u>:-

संस्थेचे एकूण उत्पन्नातून :-

| | |
|---|---|
| १. शैक्षणिक या उददेशाकरिता | - ७५ टक्के |
| २. सामाजिक या उददेशाकरीता | -१० टक्के |
| ३. वैद्यकिय उददेशाकरीता | - १० टक्के |
| ४. इतर | - ०५ टक्के |

२०) <u>कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद</u> :- संस्थेला आवश्यकता भासलयास कोणत्याही व्यक्तीकडुन अथवा बॅकेकडुन कर्ज किंवा ठेवी स्विकारता येतील. त्याकरीता मा. सह धर्मादाय आयुक्त पुणे यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२१) <u>स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबत</u>:-संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणेत तसेच विक्री करणेचा अधिकार राहिल. संस्थेला त्याकरिता कार्यकारी मंडळाची बहुमताने संमती घ्यावी लागेल. मालमत्ता विक्री करणेपुर्वी मा. सह धर्मादाय आयुक्त पुणे यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

२२) <u>बॅंक खाते</u> :- संस्थेजवळ असलेली शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेत किंवा मान्यताप्राप्त असलेल्या शेडयुल बॅंकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. अध्यक्ष,सेक्रेटरी व खजिनदार या तीन पदाधिका-यांपैकी कोणत्याही दोन पदाधिका-यांच्या सहीने रक्कम काढता येईल.

२३) <u>सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत</u> :-१८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसुची ६ च्या नमुन्यात ठेवण्यात येतील.

२४) <u>नियम व अटी नियमावलीत बदल करण्याची तरतुद</u> :- संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास सर्व साधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने

अध्यक्ष
विजय कुशाबा पिसे

सचिव
निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manohi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

ठराव मंजुर करुन नियमावलीत वदल करता येईल. १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे कारवाई पुर्ण करावी लागेल.

२४) <u>संस्थेच्या नावात व उद्देशात वदल करण्याची तरतुद</u> :-संस्थेच्या नावात किंवा उद्देशात वदल करावयाचा झालयास अथवा दोन संस्थेचे विलीनिकरण करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी १८६० चे कलम १२ अथवा १२ अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

२५) <u>विसर्जन</u> :-संस्थेचे कार्य वंद करावयाचे झाल्या ३/५ सभासदांचे वहुमताने सर्व साधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेच्या सर्व प्रकारचे देणे घेणे व्यवहार पुर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता दुस-या संस्थेला दान म्हणुन देता येईल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे पुर्ण करावी लागेल.

खरी प्रतीलिपी

अधिक्षक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

अहमदनगर विभाग, अहमदनगर

10/7/19

नक्कल तयार करणार

रुजवात करणार

अध्यक्ष

विजय कुशावा पिसे

सचिव

निलीमा रघुनाथ गुणे

PRINCIPAL

Ashvin Rural Ayurved Colleg

Manchi Hill, Ashvi Bk, Pin-41371

Tal.Sangamner, Dist.Ahmednaga

# BEFORE THE ASSISTANT CHARITY COMMISSIONER, AHMEDNAGAR.

**Misc. Application No. 61 of 2019**

**In the matter of Public Trust :**
Eklavya Adivasi Bhatkya Vimukta Jati Jamati va Magasvargiya Sevabhavi Sanstha, Ashwi (bu.), Tq. Sangamner, Dist. Ahmednagar.
**Maha/2842/1994/Ahmednagar**

Reporting Trustee filed the change report in respect of change/amend occurred in bye-laws of the trust. Particularly, address of the trust, P.T.R. No. F- 2766 (Ahm.). Said change report inquiry No. 1126/19 is accepted by this authority. Hence, it is necessary to change/amend the bye-laws of the society attached with the file of society registration having registration No. Maha/2842/1994/Ahmednagar, registered under relevant provisions of societies registration Act, 1860. Hence, I proceed to pass following order.

**Order**

i) Application is allowed.

ii) Bye-laws attached with the file of society registration be amended.

iii) The changed/amended Bye-laws (Exh. 3) as well as order passed at exh. 14 in Change Report No. 1126/19 be treated as part and parcel of this order.

10/7/19

**(Geeta P. Bankar)**
Assistant Charity Commissioner,
Ahmednagar

Ahmednagar.
Date : 10.07.2019

खरी प्रतीतिपी

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
... विभाग, अहमदनगर
10/7/19
नक्कल तयार करणार-
तपासणार-

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manchi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar

**BEFORE THE ASSISTANT CHARITY COMMISSIONER,**
**AHMEDNAGAR.**

**Change Report No. 1126/2019**
(U/s. 22 of Maharashtra Public Trusts Act, 1950)

**Exh.14**

This is a change report filed by reporting trustee Shri. Vijay Kushaba Pise in respect of "Eklavya Adivasi Bhatkya Vimukta Jati Jamati va Magasvargiya Sevabhavi Sanstha, Ashwi (bu.), Tq. Sangamner, Dist. Ahmednagar" bearing P.T.R. No. F-2766 (Ahmedangar).

2. The reporting trustee has filed this change report for deleting the old address of the trust and recording the new address of the trust in Schedule-I of the trust. The reporting trustee has filed his evidence on affidavit vide Exh. 12. To prove the contention of the application he filed on verified copy of notice of executive committee meeting dated 01.04.2019 (Exh.7), verified copy of minutes of executive committee meeting held on 08.04.2019 (Exh.7A), verified copy of notice of general body meeting dated 09.04.2019 (Exh.8), verified copy of minutes of general body meeting held on dated 24.04.2019 (Exh.8A), verified copy of notice of special general body meeting dated 09.05.2019 (Exh.9), verified copy of minutes of special general body meeting held on 24.05.2019 (Exh.10), comparative chart and amended copy of bye-laws at Exh.5.

3. Perusal of record shows that meetings have been taken as per the constitution of the trust. Notice of the meeting was served to all the members. It was unanimously resolved in the above said meetings to change the address of the trust and it be recorded at Schedule-I of the trust. There is no objection for the same till date. Hence, following order.

Ashvin Rural Ayurved College Tal Sangamner Dist. A.Nagar Manohi Hill, Ashvi Bk

PRINCIPAL
Ashvin Rural Ayurved College
Manohi Hill, Ashvi Bk, Pin-413714
Tal.Sangamner, Dist.Ahmednagar